# <u>राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक</u>

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**क्र.रामाआ/नाशिक/तक्रार क्र. : १०७/२०२२/नाशिक**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. डॉ. सुभाष काळे,<br>रा. ३, निलांबर को-ऑप, हौ. सोसा.,<br>रविंद्र हायस्कुलसमोर,मानेकशा नगर,<br>द्वारका, नाशिक, ता. जि. नाशिक. | : | तक्रारदार |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा,<br>उप अभियंता,<br>उप अभियंता नगर नियोजन विभाग,<br>नाशिक महानगरपालिका राजीव गांधी भवन, शरणपूर<br>रोड, नाशिक, ता. जि. नाशिक. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>नगर नियोजन विभाग,<br>नाशिक महानगरपालिका राजीव गांधी भवन, शरणपूर<br>रोड, नाशिक, ता. जि. नाशिक. | : | प्रतिवादी |

**<u>सुनावणी दिनांक - २३/०६/२०२२</u>**

तक्रारदार यांनी दिनांक ०८/११/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. त्यामध्ये दिनांक २३/०६/२०२२ रोजी आयोजित सुनावणीसाठी तक्रारदार उपस्थित होते. अतिरिक्त आयुक्त (शहर) नाशिक महानगरपालिका यांचेतर्फे प्रतिनिधी उपस्थित होते.

तक्रारदार यांनी त्यांच्या दिनांक ०८/११/२०२१ रोजीच्या तक्रार अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १३/०४/२०१८ रोजीच्या माहिती अर्जासंदर्भात आयोगाने द्वितीय अपील क्रमांक १९४४/२०१८/नाशिक वरील निर्णय दिनांक १८/११/२०१९ अन्वये पुढीलप्रमाणे आदेश दिले आहेत. "विद्यमान अतिरिक्त आयुक्त (शहर) नाशिक महानगरपालिका, नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता व इतर २ कर्मचाऱ्यांचे पथक गठित करुन अपिलार्थी यांनी मागितलेल्या माहितीचा कार्यालयात शोध घ्यावा आणि उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर अपिलार्थीस त्यापुढील १५ दिवसांच्या आत नोंदणीकृत पोचदेय डाकेने पाठवावे. तथापि, सदर माहितीबाबतचे अभिलेख आढळ न झाल्यास विद्यमान अतिरिक्त आयुक्त (शहर), नाशिक महानगरपालिका यांनी कागदपत्रे कार्यालयात का उपलब्ध नाहीत व त्यास कोण जबाबदार आहेत याची चौकशी

करुन जबाबदारी निश्चित करावी व त्याबाबतचे शपथपत्र आयोगास सादर करावे.” तथापि, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानुसार माहिती पुरविली मात्र सदर माहिती समाधानकारक नसुन मागितलेल्या माहितीशी काहीही संबंध नसुन चुकीची माहिती असुन अपेक्षित माहिती पुरविली नाही, अशी विनंती सदर तक्रार अर्जान्वये तक्रारदार यांनी केली आहे.

सुनावणीदरम्यान अतिरिक्त आयुक्त (शहर) नाशिक महानगरपालिका यांचे प्रतिनिधीने सांगितले की, आयोगाच्या द्वितीय अपील क्रमांक १९४४/२०१८/नाशिक वरील निर्णय दिनांक १८/११/२०१९ रोजीच्या पारित आदेशास अनुसरुन सदर माहितीचा शोध घेतला त्यानुसार दिनांक २३/०७/२०२० रोजी अभिलेख्यांत उपलब्ध असलेली ए) सन १९९३ च्या मंजुर विकास योजना आराखडयानुसार झोनिंग, बी) सन २०१७ च्या मंजुर विकास योजना आराखडयानुसार झोनिंग, सी) सन १९९३ मंजुर विकास योजना आराखडयाचा भाग नकाशा, डी) सन २०१७ च्या मंजुर विकास योजना आराखडयाचा भाग नकाशा, इ) दिनांक १३ जुन, १९८३ ची रिझॉल्युशन एक दिनांक १९ डिसेंबर, १९५७ ची जाहीर नोटीस जी) दिनांक २० ऑगस्ट, १९२३ ची जाहीर नोटीस दिनांक, एच) दिनांक २५ सप्टेंबर, १९८९ चे शासन राजपत्र, आय) दिनांक २८ ऑक्टोबर, १९८२ चे शासन राजपत्र वरील माहिती कार्यालयाच्या अभिलेख्यांत उपलब्ध असुन त्या व्यतिरिक्त इतर माहिती कार्यालयाचे अभिलेख्यांवर उपलब्ध नाही, असे कळविले. तसेच नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे-वडाळा शिवारामध्ये सर्व्हे नंबर ८०९/२ बाबतची उपलब्ध माहिती पुरविली. त्याबाबत सदर माहिती तक्रारदारस मिळाल्याची पोच आयोगास सादर करीत आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तीवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून येते की, आयोगाच्या उपरोक्त नमूद द्वितीय अपील क्रमांक १९४४/२०१८/नाशिक वरील निर्णय दिनांक १८/११/२०१९ रोजीच्या पारित आदेशानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्यानुसार तक्रारदार यांना कार्यालयातील उपलब्ध माहिती तसेच वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरविल्याचे स्पष्ट होते. त्याबाबत तक्रारदार यांना नोंदणीकृत पोचदेय डाकेने माहिती पुरविल्याची पोच आयोगास सादर केली आहे. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तक्रारदार यांना माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही, ही बाब विचारात घेता तक्रार निकाली काढण्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून प्रस्तुत तक्रारीत काहीही तथ्य नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

प्रस्तुत तक्रार क्रमांक १०७/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

---

क्र.रामाआ-नाशिक/तक्रार क्र. १०७/ २०२२/नाशिक/ओ-१८६४ दिनांक 20/09/2022